: शुक्रवार, दि. २१ नोव्हेंबर २०१४ गोवादूत

# आजीवन अध्ययन विभागाचा विस्तार समाजाभिमुख व्हावा!

## दोडामार्गात 'आजीवन अध्ययन व विस्तार'चे शिबिर

**दोडामार्ग, दि. २० (प्रतिनिधी)**

''विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचा व्याप वाढत असून १८,५०० विद्यार्थ्यांसह २०१ महाविद्यालये या विभागात सहभागी झाली आहेत. विद्यापीठ कार्यक्षेत्र ७२९ महाविद्यालयांचे असून अजूनही या विभागाच्या विस्तारास भरपूर वाव आहे. आयुष्यभर शिक्षण घेत असताना या शिक्षणाचा उपयोग समाजातील तळागाळातील घटकांपर्यंत पोहोचणे आवश्यक असून त्यादृष्टीने हा विभाग कार्यरत आहे'', असे प्रतिपादन मुंबई विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे साहाय्यक प्राध्यापक डॉ. कुणाल जाधव यांनी केले. ते येथील लक्ष्मीबाई हळबे महाविद्यालयात आयोजित केलेल्या सिंधुदुर्ग जिल्ह्यातील सर्व महाविद्यालयांच्या आजीवन अध्ययन व विस्तार विभागाच्या द्वितीय सत्रातील प्रशिक्षण शिबिरात प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. व्ही. ए. पाटील होते.

यावेळी व्यासपीठावर प्रा. डॉ. कुणाल जाधव यांच्या सह क्षेत्र समन्वयक प्राचार्य यशोधन गवस, प्रा. अरुण पणदुरकर, प्रा. डॉ. आर. एस. इंगळे उपस्थित होते. प्रारंभी दीप प्रज्वलन व सरस्वतीच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून या प्रशिक्षण शिबिराचा शुभारंभ करण्यात आला. अध्यक्षस्थानावरून बोलताना प्राचार्य डॉ. व्ही. ए. पाटील यांनी दोडमार्गची ऐतिहासिक पार्श्वभूमी सांगून आजीवन अध्ययन विभागाची वाटचाल प्रभावीपणे होत असल्याबद्दल समाधान व्यक्त केले. प्रा. पणदुरकर यांनी शिक्षणाचा समाजासाठी सातत्याने वापर होण्याची गरज प्रतिपादित केली; तर प्राचार्य गवस यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. यावेळी प्रा. डॉ. जाधव यांचा प्राचार्य डॉ. व्ही. ए. पाटील यांच्या हस्ते हस्ते शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला व त्यांना शुभेच्छा देण्यात आल्या. त्यानंतर दुसऱ्या सत्रात प्रा. यशोधन गवस, प्रा. एम. ए. ठाकूर, प्रा. राजेंद्र मुंबरकर, प्रा. एस. एन. पाटील, प्रा. भेंकी आदी विविध महाविद्यालयांच्या विस्तार शिक्षकांनी मार्गदर्शन केले व सदर विभाग आणखी कार्यरत होण्यासाठी विचार मांडले.

प्रारंभी प्रास्ताविक व स्वागत प्राचार्य डॉ. व्हि. ए. पाटील यांनी; तर प्रा. डॉ. इंगळे यांनी आभार मानले. सूत्रसंचालन प्रा. डॉ. बेग यांनी केले. या शिबिरात सिंधुदुर्ग जिल्ह्यातील सर्व २४ वरिष्ठ महाविद्यालयांचे विद्यार्थी व्यवस्थापक, विस्तार शिक्षक व क्षेत्र समन्वयकांनी सहभाग घेतला. शिबिराचे आयोजन हळबे महाविद्यालयाने नेटके केल्याने उपस्थितांनी समाधान मानले.




प्रा. डॉ. कुणाल जाधव यांचा सत्कार करताना प्राचार्य डॉ. व्ही. ए. पाटील. डावीकडून प्रा. डॉ. अरुण पणदूरकर.